# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-३८ दिनांक - ०७/०२/२०२४

## प्रेम भंगातुन महिलेस जिवेठार मारण्याचा प्रयत्न करणा-या आरोपीतास १२ तासात अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

दिनांक ०६/०२/२०२४ रोजी फिर्यादी वय २१ वर्षे व्यवसाय- नर्स रा.रुम नं ०४, गल्ली नं ०५, डोंगरपाडा, ट्रान्सफॉर्मर समोर, बिलालपाडा, नालासोपारा पुर्व ता.वसई जि पालघर, यांनी तक्रार दिली की, दिनांक ०५/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वा सुमारास फिर्यादी त्यांचे ओळखीचा मनिषकुमार गौतम याने गावावरुन आलेले सामान देण्याच्या बहाण्याने बिलालपाडा नाका, नालासोपारा पुर्व येथे बोलावुन त्याच्या प्रेमाला नकार दिल्याचा व त्यास इंन्स्टाग्राम व वॉट्सअपवर ब्लॉक केल्याचा राग मनात धरुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकुने तिचे हातावर पाठीवर, पोटावर, चेहऱ्यावर वार करुन फिर्यादीस गंभीर दुखापत केली बाबत पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I १३१/२०२४, भा.दं.वि.सं.कलम- ३०७,३५४(डी),५०४,५०६ प्रमाणे दिनांक ०५/०२/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावर भेट दिली आरोपीत याचे बाबत काहिएक माहिती प्राप्त नसतांना ञोटक व तांत्रिक माहितीचे आधारे आरोपीत याचा कुर्ला, मालाड मुंबई परीसरात कसोशिने शोध घेवुन इसम नामे. मनिष बुधाराम गौतम वय- २१ वर्षे, रा.बैल बाजार, कुर्ला, मुंबई यांस तो उत्तरप्रदेश राज्य येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना यशस्वीरित्या ताब्यात घेवुन, त्यांस दि.०६/०२/२०२४ रोजी सदर गुन्हयात अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अर्जुन पवार हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/तुकाराम भोपळे, पोहवा/तानाजी चव्हाण, पोअं/रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील नेम.पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा./नामदेव ढोणे, पोअंम/सोहेल शेख नेम.पोलीस उप आयुक्त कार्यालय, परीमंडळ-३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
पेल्हार पोलीस ठाणे